UGC Approved Sr. No. 49366


SRJIS


Online ISSN -2278-8808

Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED

IMPACT FACTOR SJIF 2016 6.177






An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

SJIF 2016 = 6.177

**Online ISSN 2278-8808** **Printed ISSN 2349-4766**

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

**OCT-DEC, 2017, VOL-6, ISSUE-34**

266 **भारतीय शेतीची आधुनिकता आणि सद्यस्थिती**
*प्रा. डॉ. कदम प्रमोदिनी विठ्ठल (1173-1181)*

267 **मानव संसाधन व्यवस्थापन :– श्रमशक्तीचा आदर्श स्त्रोत**
*डॉ. डी.एस. पाटील (1182-1188)*

268 **भारतातील कृषि क्षेत्र आणि कर्जपुरवठा**
*प्रा.डॉ. अरुण तवार & प्रा.डॉ. शिवाजी पाते (1189-1192)*

269 **औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान**
*प्रा.डॉ.आर.डी. भोसले (1193-1196)*

270 **भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि शेती विकास**
*प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे (1197-1202)*

271 **मानव विकास निर्देशांक व भारतीय मुस्लिम समाज— अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालूक्यातील शहरी भागाचा एक व्यष्टी अध्ययन**
*प्रा. डॉ. विजयकुमार वावळे, शायिन यासिन शेख (1203-1209)*

272 **भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी एक अभ्यास**
*अनंत श्रीराम राठोड (1210-1213)*

273 **वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव**
*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

274 **कातकरींचा सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास**
*डॉ. आर. के. दातीर & श्री. विनायक तु. खातळे (1217-1220)*

275 **भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?**
*प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. जी. वैद्य (1221-1226)*

276 **अहमदनगर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा चिकित्सक अभ्यास**
*संगिता रामेश्वरलाल जांगीड & प्रा.डॉ.ए.एम.पवार (1227-1229)*

277 मानवी विकास निर्देशांक

*डॉ. सुरेखा भिंगार दिवे (1230-1232)*

278 कॅशलेस अर्थव्यवस्था

*डॉ. मनिषा कारभारी आहेर (1233-1236)*

279 भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका

*डॉ. नासिकेत गो. सुर्यवंशी & प्रा. गोविंद रा. काळे (1237-1240)*

280 जीएसटी च्या ग्राहकांवर पडणारा प्रभाव

*प्रा. डॉ. शेवाळे चंद्रकला नामदेव (1241-1243)*

281 विमुद्रीकरण: अपेक्षा आणि वास्तव

*डॉ. दिपक एन.कारे (1244-1248)*

282 सूक्ष्मवित्त आणि स्वयंसहाय्यता बचतगट

*मनिषा राजेंद्र सामंत (1249-1253)*

283 परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम

*गणेश वामन (1254-1255)*

284 निती आयोग अर्थव्यवस्थेची गरज

*प्रा. वाकचौरे बी. एस (1256-1258)*

285 वस्तु व सेवा कराचे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम

*श्री. संतोष ज्ञानदेव जाधव & प्रा.डॉ.एस.जी.वैद्य (1259-1262)*

286 पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे अहमदनगर जिल्हयातील सामाजिक, आर्थिक परिणामांचे अध्ययन

*गोरक्ष कडवे (1263-1267)*

287 वस्तू व सेवा कर प्रणालीचे परिणाम व भवितव्य

*प्रा. सीमा चव्हाण (1268-1272)*

288 निश्चलनीकरण (Demonetization of Currency )

*डॉ. विश्वास र. कदम (1273-1279)*

289 भारतातील कृषी यांत्रिकीकरणाची प्रगती आणि भवितव्य

*प्रा. बापू ठका खिलारी, डॉ. संभाजी भाउराव काळे (1280-1285)*

290 भारतातील शेतक-यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय

*प्रा. सुकुमार दत्ता पाटील & सौ. के. जी. ताम्हाणे (1286-1290)*

291 मानव विकास निर्देशांकाबाबत भारतातील सद्यःस्थिती

*प्रा. संदेश सदाशिव तावडे & प्रा.डॉ. पंकज त्र्यंबक निकम (1291-1294)*

292 वस्तु आणि सेवा कर आणि त्याचे परिणाम

*डॉ. डी. ए. सोनवणे (1295-1297)*

*प्रा. सुकुमार दत्ता पाटील & सी. के. जी. ताम्हाणे (1286-1290)*

# भारतातील शेतक-यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय

**प्रा. सुकुमार दत्ता पाटील & सी. के. जी. ताम्हाणे**

*एम. ए. बी. एड. अर्थशास्त्र (अधिव्याख्याता) कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व कला महाविद्यालय रोहा रायगड*

**गोषवारा** आज भारताचे स्थुल देशांतर्गत उत्पादन हे दोन अंकी असले तरी त्याच वेळेस प्रत्येक वर्षागणिक भारतामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या या वाढत चालल्या आहेत आणि ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. कारण या देशातील अब्जावधी जनतेला जगवण्याचे सामर्थ्य ज्याच्यामध्ये आहे तोच शेतकरी जर आत्महत्या करू लागला तर ते अतिशय वाईट आहे. आज भारतीय शेती आणि येथील शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा आहे असे असले तरी आपल्या देशात दर तीन तासास एक शेतकरी आत्महत्या करीत आहे. आज भारतातील ४0% शेतकरी अशा स्थितीत येऊन पोहोचले आहेत की जर त्यांना वेगळा व्यवसाय उपलब्ध झाला तर ते एका पायावर शेती व्यवसाय सोडून द्यायला तयार आहेत. त्यामुळे आज आपल्या देशातील शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या हा गंभीर प्रश्न बनला आहे आणि त्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भारतीय शेतक-यांच्या आत्महत्या या भारतात जवळजवळ प्रत्येक राज्यात आज होताना दिसत आहेत. त्यामुळे या प्रश्नाचा आज गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. आज भारतीय शेतीचे अर्थव्यवस्थेत असणारे महत्व आणि राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा असणारा वाटा लक्षात घेतल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय फारच गंभीर असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत आणि शेतक-याला व शेतीला चांगले दिवस आले पाहिजेत. हे आज सर्वमान्य झाले आहे.

**अभ्यासाचे महत्व** १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १५0 वर्षाच्या इंग्रज सरकारच्या राजवटीत भारतीय शेतीची म्हणावी तेवढी प्रगती झाली नाही; कारण त्यांच्या काळात शेतीवर कराचे प्रचंड ओझे होते. परिणामी शेतक-यांनीही शेती व्यवसायात फारसा उत्साह दाखवला नाही. परिणामी भारतीय शेती विकसीत झाली नाही. तसेच तिचे दरहेक्टरी उत्पादनही वाढले नाही. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने नियोजनाच्या माध्यमातून देशाचा विकास करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने मग १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना सुरू केली आणि या योजनेत शेती विकासावर विशेष भर देण्यात आला. त्यामूळे १९५१ ते १९५६ या काळात शेती व्यवसायाचा चांगला विकास झाला. परंतू त्यानंतरच्या योजनांमध्ये मात्र औद्योगिक विकास व व्यापार विकास यावर भर देण्यात आला. आणि शेती क्षेत्राच्या विकासावर कमी आर्थिक तरतूद करण्यात आली. तसेच शेती क्षेत्रातील सरकारची गुंतवणूकही कमी होत गेली. त्यामुळे शेती व्यवसाय तोटयात जाऊ लागला. तसेच शेतक-यांची अवस्थाही कठीण होत गेली यातून शेतक-यांच्या आत्महत्या सुरू झाल्या आणि ही बाब भारतीय शेती आणि तिचा विकास व ग्रामीण विकास यामध्ये बाधा निर्माण करणारी ठरली. त्यामुळे 'शेतकरी जगला तरच देश जगेल' या उक्तीनुसार शेतक-यांच्या आत्महत्या या समस्येकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखे नाही. आजही भारतातील ६५% लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. तसेच शेती हे ग्रामीण भागातील रोजगाराचे मुख्य साधन आहे. तसेच